# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ७

सभावृत्तांत

दिनांक ०५/१०/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची नियमित मासिक सभा शुक्रवार दिनांक ०५/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती वाघमारे अश्विनी विक्रम | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ४) | मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड | सदस्या |
| ५) | मा. श्री. कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ६) | मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ७) | मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |

------------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

२) मा. श्री. जगताप महेश दत्तात्रय.

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे, क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे,प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा.बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. डॉ. अरुण दगडे, पशू वैद्यकीय अधिकारी, मा. व्ही.एन. देसले, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. माडे आर.एस. कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण विभाग, मा. राजेंद्र जगताप, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. मोरे सुधीर, मा. कदम वर्षा,कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. भालेराव एस. डी., मा. कावळे एम.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. धुमाळ प्रवीण, मा. एस.यु. कुतवळ, मा. अमिन दिक्षित, मा. शरद मोरमारे, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत बी., मा. ढोले भाग्यश्री, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. गेंगजे व्ही.एस. क्रीडा निरीक्षक, मा. सोनवणे अतुल, मा. मोरे शशिकांत, मा. सौदाई आर. एम., मा.कोतवडेकर संदीप, आरोग्य निरीक्षक, मा. चंद्रकांत सी. मोरे, हॉर्टी. सुपरवायझर, मा. पटेल जे.व्ही., उद्यान निरीक्षक,मा.

प्रिती का सार, स्था. अभि. सहाय्यक, पाणी पुरवठा, मा. दुदुसकर सुनिल, मा. खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे ऑक्टोबर २०१८ ची नियमित मासिक सभा दि. ०५/१०/२०१८ रोजीचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र. १** :- ड प्रभाग समितीमध्ये बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटनांचे तीन प्रतिनिधी नेमण्यात आले असुन त्यांना आयडेंटिटी कार्डस, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र व लेटरपॅड इ. सुविधा उपलब्ध करुन देणेच्या विषयास ड प्रभाग समितीमध्ये मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव

**विषय क्र.** २ :- प्रभाग क्र. २६ मधील पिंपळे निलख येथील प्रभाकर साठे उद्यानात असलेला कारंजा अनेक दिवसांपासुन बंद आहे तसेच तिथे असलेल्या कारंज्यामुळे पाण्याचा मोठया प्रमाणावर अपव्यय होतो. शहरात सध्या पाण्याची मोठया प्रमाणावर टंचाई आहे. त्या दृष्टीने सदर कारंजे पाडल्यास पाण्याचा अपव्यय होणार नाही तसेच या ठिकाणी सदरचे कारंजे पाडून नागरीकांसाठी योगासाठी स्वतंत्र कक्ष बनविल्यास नागरीकांसाठी फायद्याचे होणार असल्याने प्रस्ताव मान्यतेसाठी

**तदनंतर माहे ऑक्टोबर २०१८ च्या मासिक समितीचे नियमित कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. तुषार कामठे** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील कार्यक्षम कार्यकारी अभियंता श्री. जीवन गायकवाड यांचे दि. ४/१०/२०१८ रोजी दु:खद निधन झालेने तसेच प्रभाग क्र. २९ मधील ज्येष्ठ नागरीक श्रीमती सावित्रीबाई ज्ञानोबा कदम व श्रीमती आनंदीबाई बानोसा पाचारणे दु:खद निधन झालेने त्यांना श्रध्दांजली वाहून माहे ऑक्टोबर २०१८ ची दि. ५/१०/२०१८ रोजीची प्रभाग समिती सभा तहकुब करण्यात यावी अशी सूचना मांडतो.

**मा. संदीप नखाते** : सदर सूचनेस मी अनुमोदन देतो.

सर्व उपस्थित अधिकारी, ड प्रभाग समितीचे सर्व सन्मा. सदस्य व कर्मचारी यांनी दोन मिनिटे उभे राहून पिंपरी चिंचवड मनपाचे कार्यकारी अभियंता कै. जीवन गायकवाड, ज्येष्ठ नागरीक कै.श्रीमती सावित्रीबाई ज्ञानोबा कदम व कै. श्रीमती आनंदीबाई बानोसा पाचारणे यांना श्रध्दांजली वाहिली.

**मा. सभापती** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील कार्यक्षम कार्यकारी अभियंता श्री. जीवन गायकवाड यांचे दि. ४/१०/२०१८ रोजी दु:खद निधन झालेने महापालिकेचे नुकसान झाले आहे व ही पोकळी कधीही भरुन येणारी नाही. सबब माहे ऑक्टोबर २०१८ ची सभा सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहून तहकुब करणेत येत असुन माहे नोव्हेंबर २०१८ च्या नियमित सभेपूर्वी घेणेत यावी.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,**
ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
( सिताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१५४/२०१८
दिनांक – ०५ /१०/२०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ७

सभावृत्तांत

दिनांक ०२/११/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची दि. ५/१०/२०१८ रोजीची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१) मा. श्रीमती वाघमारे अश्विनी विक्रम सदस्या

---------

खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य सभेस उपस्थित होते.

१) मा. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे, क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे,प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा.बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. डॉ. अरुण दगडे, पशू वैद्यकीय अधिकारी, मा. व्ही.एन. देसले, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. माडे आर.एस. कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण विभाग, मा. राजेंद्र जगताप, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. मोरे सुधीर, मा. कदम वर्षा,कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. भालेराव एस. डी., मा. कावळे एम.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. धुमाळ प्रवीण, मा. एस.यु. कुतवळ, मा. अमिन दिक्षित, मा. शरद मोरमारे, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत बी., मा. ढोले भाग्यश्री, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. गेंगजे व्ही.एस. क्रीडा निरीक्षक, मा. सोनवणे अतुल, मा. मोरे शशिकांत, मा. सौदाई आर. एम., मा.कोतवडेकर संदीप, आरोग्य निरीक्षक, मा. चंद्रकांत सी. मोरे, हॉर्टी. सुपरवायझर, मा. पटेल जे.व्ही., उद्यान निरीक्षक,मा. प्रिती का सार, स्था. अभि. सहाय्यक, पाणी पुरवठा, मा. दुदुसकर सुनिल, मा. खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे ऑक्टोबर २०१८ ची दिनांक ५/१०/२०१८ रोजीची दि. ०२/११/२०१८ रोजी आयोजीत तहकुब मासिक सभा आवश्यक त्या गणपूर्तीअभावी तहकुब करण्यात येत असुन सदर सभा माहे डिसेंबर २०१८ च्या सभेपूर्वी घेणेत येईल.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,** ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
(सीताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१६४/२०१८
दिनांक – २० /१२/२०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ७

सभावृत्तांत

दिनांक ०७/१२/२०१८ सकाळी ११.३०वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१८ ची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक ०७/१२/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या " छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) मा. श्रीमती वाघमारे अश्विनी विक्रम | सदस्या |
| ३) मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ४) मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ५) मा. श्री. कलाटे मयूर पांडुरंग | सदस्य |
| ६) मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ७) मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ८) मा. श्री. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ९) मा.श्री. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे | सदस्य |
| १०) मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |

---------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव

२) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

३) मा. श्री. जगताप महेश दत्तात्रय

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे, क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता, विद्युत, मा. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, मा. संध्या वाघ, मा. व्ही.एन. देसले, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा.

डी.डी. पाटील, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. सुनिल नरोटे, उपअभियंता, स्था. उद्यान, मा. एस.बी. पाटील, मा. एस.एन. अहिरे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. सुनिल भागवानी, उपअभियंता, नगररचना, मा. लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. एस.एच. खोत, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. सी.एम. कुंभार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. कावळे एम.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा.अमित दिक्षित, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. बी.एल. मुलाणी, जयवंत रोकडे, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. प्रविण धुमाळ, शरद मोरमारे, ए.ए. दिक्षीत, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, मा. सोनवणे अतुल, मा. मोरे शशिकांत, एम., मा.कोतवडेकर संदीप, मा. गेंगजे व्ही.एस., क्रीडा निरीक्षक, मा. बी.डी. तरवडे, अतिक्रमण निरीक्षक, मा. जे.व्ही. पटेल, सहा. उद्यान अधिक्षक, मा. दुदुसकर एस.एस., खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**तदनंतर माहे ऑक्टोबर २०१८ च्या मासिक समितीचे नियमित कामकाज सुरु करण्यात आले.**

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे ऑक्टोबर २०१८ दि. ०५/१०/२०१८ रोजीचे तहकुब सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- मागील प्रभाग सभा कार्यपत्रिका क्र. ६ माहे सप्टेंबर २०१८ चा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** :- मागील प्रभाग सभा कार्यपत्रिका क्र. ६ माहे सप्टेंबर २०१८ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे ऑक्टोबर २०१८ च्या विषयपत्रिकेवरील विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

विषय क्र. १ — ठराव क्र. २०

दिनांक : ०७/१२/२०१८ — विभाग – भूमि जिंदगी विभाग

सुचक : मा. सागर सुनिल आंगोळकर — अनुमोदक : मा. संदिप अरुण कस्पटे

संदर्भ : क्षेत्रिय अधिकारी ड क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील दि. ०३/०९/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेकामी मा. आयुक्त यांनी दिनांक २७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेत दिलेल्या सूचनेनुसार ड प्रभागासाठी प्रभाग स्तरावर फेरीवाला उपसमितीचे गठन करण्यात आले असुन त्यात क्षेत्रिय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्य शासन तसेच मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रात हॉकर्स झोन निश्चित करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात आली असुन निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स झोनचे सोबतचे प्रपत्र अ चे अवलोकन होऊन

झोन निश्चितीस मान्यता  देणेबाबतचे प्रस्तावावर चर्चा झाली. सदर प्रस्तावास प्रभाग क्र. २५ वाकडचे सन्मा. सदस्य श्री. राहुल कलाटे यांनी खालीलप्रमाणे उपसूचना दिली .

प्रभाग क्र. २५ वाकड मधील ओमेगा पॅराडाईज (डावी बाजू)व ईडन टॉवर इमारतीच्या कंपाऊंडलगत (माऊली चौक ते एम.एस.सी.बी. जवळचा रस्ता) या दोन जागा ऐवजी मनपाच्या ताब्यात आलेल्या कोहीनुर मिठाई मॉल व डययोडील सोसायटी समोर दत्त मंदिर रोड या जागा हॉकर्स झोनसाठी निश्चित करण्यात याव्यात. सदर सूचनेस सन्मा. सदस्या श्रीमती अश्विनी वाघमारे यांनी अनुमोदन दिले.  त्यानुसार सन्मा. सदस्य श्री. राहुल तानाजी कलाटे यांची उपसूचना विचारात घेऊन प्रभाग क्र. २५,२६ २८ व २९ येथे सोबतचे प्रपत्रानुसार हॉकर्स झोनचे  प्रस्तावास उपसूचनांसह मंजुरी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. २ ठराव क्र. २१

दिनांक :  ०७/१२/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. अश्विनी विक्रम वाघमारे अनुमोदक : मा. राहुल तानाजी कलाटे

संदर्भ : सन्मा. सदस्या श्रीमती अश्विनी विक्रम वाघमारे  यांचेकडील दि.७/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव

वाकड उड्डाणपुलापासून ते काळा खडक पर्यंत जाण्याचा रोड मध्ये इडन गार्डन पासून प्रोलाईफ प्रिस्टीनपर्यंतच्या सर्व जमिनी हया वाघमारे कुटुंबांच्या असल्यामुळे समस्त वाघमारे कुटुंबाच्या मागणीप्रमाणे इडन गार्डन शेजारील कॉर्नरसाठी वाघमारे कॉर्नर असे व प्रिस्टीन प्रोलाईफ सर्व्हे. नं.१७०/१० या चौकास विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. ३ ठराव क्र. २२

दिनांक :  ०७/१२/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. राहुल तानाजी कलाटे अनुमोदक : मा. अश्विनी विक्रम वाघमारे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. राहुल तानाजी कलाटे यांचेकडील दि.१०/९/२०१८

प्रभाग क्र. २५ वाकड येथील शनी मंदिर मारुंजी रोड सर्व्हे नं. १०८/२/१ इलाईट होम हौसिंग सोसायटीसमोर वाकड गावचे सुपुत्र कै. नारायण सोपानराव वाकडकर यांच्या नावाने चौकाचे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

विषय क्र. ४ ठराव क्र. २३

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. मयुर पांडुरंग कलाटे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.१८/९/२०१८

प्रभाग क्र. २६ (वाकड- पिंपळे निलख) मौजे वाकड सर्व्हे नं. १९३ दत्तमंदिर जवळील वाकड रोड, शेजारील कॉलनीस "कै. भरत हरिभाऊ कलाटे नगर" हे नाव स्थानिक रहिवासी यांच्या मागणीनुसार घोषित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले दि. २/११/२०१८ रोजीचे सभेमध्ये दाखल करुन घेणेत आलेल्या विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. ५ ठराव क्र. २४

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग –प्रशासन विभाग

सुचक : मा.श्री. तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा. श्री. संदीप अरुण कस्पटे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. तुषार गजानन कामठे यांचेकडील दि.०५/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव

ड प्रभाग समितीमध्ये बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटनांचे तीन प्रतिनिधी नेमण्यात आले असुन त्यांना आयडेंटिटी कार्डस, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र व लेटरपॅड इ. सुविधा उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

विषय क्र. ६ ठराव क्र. २५

दिनांक : ०७/१२/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा.श्री. तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. तुषार गजानन कामठे यांचेकडील दि.०५/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ मधील पिंपळे निलख येथील प्रभाकर साठे उद्यानात असलेला कारंजा अनेक दिवसांपासुन बंद आहे तसेच तिथे असलेल्या कारंज्यामुळे पाण्याचा मोठया प्रमाणावर अपव्यय होतो. शहरात सध्या पाण्याची मोठया प्रमाणावर टंचाई आहे. त्या दृष्टीने सदर कारंजे पाडल्यास पाण्याचा अपव्यय होणार नाही तसेच या ठिकाणी सदरचे कारंजे पाडून नागरीकांसाठी योगासाठी स्वतंत्र कक्ष बनविल्यास नागरीकांसाठी फायद्याचे होणार असल्याने प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------

मा. सभापती : माहे ऑक्टोबर २०१८ चे सभेस उपस्थित सर्व सदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन सभा संपली असे जाहीर करतो.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,**
ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
(सीताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/ १६६/२०१८
दिनांक – २७ /१२/२०१८